**एम.ए.सी.पी.क्र.२६८/२०२२**
CNR - MHST01-003019-2022
(धनाजी दत्तात्रय कुतवळ व इतर विरुध्द
भानुदास महिपती डोंबळे व इतर)

**निशाणी क्र.१५ खालील आदेशः**–

जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरीता हा अर्ज सादर केला आहे.

२) निशाणी क्र.१५ वरील अर्ज व अर्जदारांतर्फे दिलेले म्हणणे वाचले.

३) जाबदार क्र.२ यांच्या कथनाप्रमाणे आवश्यक कागदपत्रे व माहिती मुदतीमध्ये न मिळाल्याने त्यांना वेळेत कैफियत दाखल करता आली नाही व त्यांनी जाणुनबुजून उशीर केला नाही. जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करणेची संधी न दिल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होईल असे कथन केले. अर्जदारांतर्फे उशीराबाबत आक्षेप घेतला.

४) जाबदार क्र.२ यांनी आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत न मिळाल्याने त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नसल्याचे कारण दिले आहे व न्यायाच्या दृष्टीने सदर विलंब माफ होण्याची मागणी केली. अर्जदारातर्फे उशीराबाबत आक्षेप घेतला. जाबदार क्र.२ तर्फे अर्जात नमुद केलेले कारण, अर्जदारांचा आक्षेप तसेच प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता प्रस्तुत प्रकरणाचा गुणदोषावर निकाल होणेकरीता अर्ज मंजुर करुन जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करणेस परवानगी देणे उचीत होईल. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**आदेश**

(१) अर्ज (निशाणी क्र.१५) मंजुर करणेत येतो.

(२) जाबदार क्र.२ यांना कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो व कैफियत दाखल करणेस परवानगी देणेत येते.

NITIN HANMANTRAO JADHAV

Digitally signed by NITIN HANMANTRAO JADHAV
Date: 2023.10.17 15:40:18 +0530

सातारा.
दिनांक – १७/१०/२०२३.

(नि.ह. जाधव)
जिल्हा न्यायाधीश–५ व
सदस्य, मोटार अपघात न्यायाधिकरण, सातारा